# प्राचीन वास्तू: त्रिविक्रम मंदीर तेर

* प्रा. डॉ. सोमवंशी संजय रामराव

**शोधपत्र**

प्राचीन तेर (तगर) हे गाव महाराष्ट्रातील मराठवाडा विभागा मध्ये असणा-या उस्मानाबाद या जिल्हयात आहे. पुराणवास्तू संशोधकाना व इतिहासजीज्ञासूना हे गाव अधिक परिचीत आहे. जरासे आडवळणी असणा-या तेर या गावाला भेट देण्यासाठी भारतीय आणि परकिय विद्वान उत्सुक असतात.

**प्राचीन तेर :-**सध्या अस्तीतत्वात असणा-या तेर या गावाला विस्तार हा फार मोठा असलेला दिसून येत नाही. असे असले तरी प्राचीन काळी तो खूपच विस्तृत असवा असे तेथे उपलब्ध असणा-या अवशेषावरुन वाटते तेरणा नदीच्या दोन्ही काठावर असलेले जुने अवशेष सामावून घेणारी पांढ-या मातीची विस्तृत टेकाडे आपणास आढळून येतात इ.स. सुरवातीच्या काळात परकिय प्रवाशांच्या नोंदी व आता पर्यन्त तेथे झालेली उत्खनने तसेच तेरला आजही पाहावयास मिळणारी प्राचीन वास्तूंची आवशेष ही तेरची प्राचीन वैभवाची साक्ष देतात.

**तेर संबंधी प्राचीन नोंदी :-**तेर चा प्राचीन लिखानातील उल्लेख हे आज अत्यंत महत्वाचे ठरले आहेत "पेरिप्लस ऑफ दि एरिथ्रियनसी" हा इ.स. ५० ते १०३ या काळात एक ग्रीक खलाशाने जो ग्रंथ लिहला त्यात तेरचा 'तगर' या नावाने उल्लेख आहे. त्या व्यतिरिक्त तेरचा उल्लेख टॉलेमी च्या प्रवास वर्णनानात आढळून येतो. तो म्हणतो तेर (तगर) ही नगरी समुद्र किणा-या पासून आत 'अरियके' (Ariake) या प्रदेशात आहे. तसेच कझिन्स यांना तेर येथे तेरचे महात्म्य वर्णन करणारे हस्तालिखीत उपलब्ध झाले त्यांचा काळ इ.स. १७५७ (शके १६७९) असा आहे.

**संशोधन व उत्खनन :-**साधनांच्या विपुलतेमुळे विविध अशा संशोधकानी तेरचे अन्वेषण पुरावा उपलब्ध केले आहे. या पुरातत्वीय संशोधनात जो पुरावा उपलब्ध झालेला आहे. त्यामुळे तेरची प्राचीनता ही इ.स. पू बरीच मागे नेता आली. सध्या तेर येथे असलेली मंदीरे इ.स. पाचवे, सहावे शतक ते इ.स. सोळावे शतक या काळातील आहे परंतु उत्खननात सापडलेले अवशेष इ.स.पू. दुस-या, तिस-या शतका पर्यन्त कालदृष्टया प्राचीन ठरलेले आहेत. डॉ. दिक्षीतांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्र शासना तर्फे इ.स. १९६७ - ६८ साली तरे (तगर) येथे झालेल्या उत्खननात मोठया आकाराचा स्तुपाचे आणि अर्धवर्तुळाकृती पृष्ठभाग असलेल्या बौध्द चैत्यगृहाचे अवशेष या उत्खननात सापडल्याने प्राचीन ऐतिहासीक काळात तेर हे बौध्द धर्माचे मोठे केंद्र होते. असे सिध्द होण्यास मोठी मदत होते. सध्याचे त्रिविक्रमाचे मंदीर जे पूर्वी चैत्यगृह होते. या पुराव्यास त्यामुळे मोठी मदत होते.

**तिविक्रम चैत्यगृह :-** बौध्द चैत्यगृहे ही विटांनी बांधलेली हिंदूस्थानात मोठया प्रमाणात उपलब्ध नाहीत असे असले तरी या ठिकाणी हे नमूद करणे आवश्यक वाटते की तेरला सध्या असस्तित्वात असलेले 'तिविक्रमाचे मंदीर' हे मूळचे बौध्द चैत्यगृह होते. उत्खनात सापडलेला स्तूप आणि चैत्यगृहा व्यतिरिक्त विविध प्रकारचे अवशेष तेर येथे सापडलेले त्रिविक्रम चैत्यगृह आणि हा स्तूप तेर हे एक नामांकित बौध्द केंद्र असावे असे सिध्द करता येते. त्याच प्रमाणे स्तूपाची रचना शैली आंध्र शैलीप्रमाणे होती हे ही प्रामुख्याने लक्षात येते.

**आजचे त्रिविक्रम मंदीर :-** आज त्रिविक्रमाचे म्हणजेच विष्णूचे मंदीर म्हणून ओळखली जाणारी ही वास्तु बौध्द धर्मियांचा चैत्य होता हे कदाचित अनेकांना माहिती नसेल कालांतराने या चैत्याचे रुपांतर हिंदूच्या त्रिविक्रमाच्या देवळात करण्यात आले मुलतः त्याची रचना चैत्यासारखीच आहे. तरे (तगर) या गावाच्या मध्यभागी असणारी ही वास्तु पूर्णपणे विटांनी बांधलेली आहे कदाचित ही वास्तु त्रिविक्रमाचे मंदिर म्हणून हिंदूनी त्याचा वापर केल्यामुळे ही वास्तु उध्वस्त न होता. चांगल्या स्थितीत राहण्यास मदतच झाली असवी. त्रिविक्रम मंदिर हे पूर्वाभिमुख आहे. त्याचा उल्लेख अगदी साधा आहे. गर्भगृह व मंडप ही प्रमुख दोन अंग अथवा भाग आहेत. मात्र मंडप हा नंतरच्या काळात बांधलेला आहे या वास्तुचे गर्भगृह हे पूर्णपणे बौध्द चैत्यासारखे आहे. सुमारे ८ मिटर लांब आणि ४ मिटर रुंदीच्या या गर्भगृहाचा पृष्ठभाग अर्थवर्तुळाकृती असून त्या वरील छप्पर गजपृष्ठाकृती आहे. म्हणजे हत्तीच्या पाठीच्या आकाराचे असल्याचे दिसते हे सर्व बांधकाम ४३ x २३ x ७ से.मी. या अकाराच्या विटांचे केलेले असून या विटा चिखलात पक्क्या बसविलेल्या आहेत गर्भगृहाच्या भित्तीची जाडी सुमारे सव्वा मिटर असून सर्व बांधकाम अप्रतिम कौशल्याने केलेले आहे.

**मुख्य गर्भगृहाचा दर्शनी भाग :-**मुख्य गर्भगृहाच्या अगदी समोर एक मंडप दिसतो परंतु तो कालदृष्टया नंतरचा असल्याचे आढळते गर्भगृहाचा दर्शनी भाग बौध्द लेण्याच्या दर्शनी भागासारखा आहे. म्हणजे चैत्यगवाक्षासारखा आहे. गवाक्ष करण्यासाठी उपयोगात आणल्या जाणा-या लाकडी कमाणीची प्रतिकृती अत्यंत कौशल्याने निर्माण केलेली आहे. सर्व काम विटांचे असले तरी त्यावर आता चुन्याचा थर दिलेला आहे. गर्भगृहाच्या गजपृष्ठाकृती छपराची बांधणी ही थरातील विटांची बैठक प्रत्येक थरात आत सरकणारी (Corbelling) करुन कमाण निर्माण होईल अशी केलेली आहे. दर्शनी भागाचे स्वरुप असे आहे की ते पाहताच वेरुळच्या विश्वकर्मा लेण्याची आठवण व्हावी तसेच गर्भगृहाचे प्रवेशद्वार हे अत्यंत

* महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालय उदगीर जि. लातूर

लहान आहे. एवढया छोटयाद्वारा मधुन सध्या गर्भगृहात असणारी भव्य त्रिविक्रमाची मुर्ती आत कशी गेली असेल हा प्रश्न उपस्थित होतो कदाचित असे ही असेल की मूळचे प्रवेशद्वार सध्या पेक्षा मोठे आणि प्रशस्त असावे.

**गर्भगृहाचा बाहय भाग :-**दर्शनी भागावरील चैत्यगवाक्ष सोडल्यास गर्भगृहाच्या बाहेरील भागावर साधा गोलाईचा थर (Roll moulding) अर्धस्तंभ (Pilasters) या शिवाय कोणतेही अलंकरण नाही या अर्धस्तम्भाचा बांधणीच्या दृष्टीने उपयोग नसला तरी जे जणू काही वास्तूच्या इमल्याला आधार देतात असा अभास निर्माण करतात छपराची खालची कड भित्तीच्या माश्याच्यावर अधांतरीत पुढे असल्यामुळे संबंध चैत्य झोपडी या बांधणीची आठवण करुन देतो. आता चैत्याचा संबंध वास्तूवर चुण्याचा गिलावा दिलेला आहे. मात्र कार्झन्सच्या मते चुण्याचा गिलावा हा नंतरच्या काळातला नसून तो मूळचाच असवा त्याच प्रमाणे संबंध वास्तूची उंची साधारणपणे जमिनी पासून १० मिटर आहे.

**गर्भगृहाचा अंतर्भाग :-**या चैत्याच्या गर्भगृहात प्रवेश केल्यानंतर कालभैरवाची दगडी मुर्ती पहावयास मिळते. या मूर्तीच्या मागे विटाची भिंत बांधलेली असून तिच्या एका बाजूस आत जाण्यासाठी दरवाजा आहे. कझिन्सच्या मते कालभैरवाची मूर्ती मुसलमान काळात मूळ मूर्ती विध्वंसकापासून वाचवण्यासाठी ठेवली असावी या मूर्तीच्या मागे असणा-या भिंतीच्या दरवाज्यातून आत गेल्यावर आपणास तिविक्रमाची मूर्ती नजरेस पडते. या भव्य मूर्तीच्या पुढे विष्णूची मूर्ती आहे. दोन्ही मूर्ती हया काळया दगडात आहेत या दोन्ही भग्नावस्थेत दिसतात नारायणाची मूर्ती ही अलंकारांनी मढवलेली दिसते तीच्या हातात गरुडाची मूर्ती आहे. तर विष्णूच्या मूर्तीचे पाय तुटलेले आहेत. तिविक्रमाची मूर्ती काळया दगडाची असून तिचा वरचा भाग हा शाबुत आहे. कानात मोठे अलंकार गळयात तीन वेगवेगळया प्रकारचे हार बाहुवर बाजूबंद आणि मनगटावर रुंद नक्षीदास कंकणे आहेत. त्रिविक्रमाचा उजवापाय खाली सोडलेला असून डावा बैठकीच्या कडेने उंचावलेला आहे. या उंचावलेल्या पायाखाली बल्ली, बल्ली पत्नी इ. मूर्ती आहेत बौध्द चैत्यगृहाचे नंतरच्या काळात वैष्णवीकरण झाल्याचे हे एक उदाहरण आहे. या वैष्णव मूर्तीची प्रतिष्ठापना करण्यासाठी चैत्यगृहातील शहाबाजी फरशीचा स्तूप कदाचित उखडून टाकला गेला असावा.

**गर्भगृहा समोरील मण्डप :-**त्रिविक्रम मंदिराच्या गर्भगृहासमोरील मंडप हा चैत्यगृहा पेक्षा नंतर बांधलेला दिसतो परंतु तो फारच नंतर बांधला गेला असे वाटत नाही. त्यावरील थर आणि अर्धस्तम्भ मूळ चैत्यगृहा प्रमाणेच असल्याने हा मण्डपही प्राचीन असावा विटांनी आणि लाकडी खालाच्या साहयाने बांधलेला हा मंडप चार ते सवाचार मिटर उंचीचा आहे. याचे छप्पर सपाट असून ते लाकडी खांबांनी तोलून धरलेले आहे. छपरावर विटांचा थर असून मंडप बाहेरुन चुन्याने लिपलेला आहे. मंडपाच्या बाहेरील भागावर उठावात अर्धस्तम्भ असुन गोलाईच्या स्थराचे अलंकरण आहे. अशी दोन्ही वैशिष्टये चैत्यगृहाच्या बाहय भागावर दिसून येतात. यैत्यगृह व मण्डप ही दोन्हीही मात्र एकाच वेळी बांधलेली दिसून येत नाही. त्यासाठी वापरलेल्या विटाही सारख्या नाहीत.

**उपसंहार :-**तेरच त्रिविक्रम मंदिराची मूलतः बौध्द चैत्यगृहाची काही वैशिष्टये लक्षात घेणे आवश्यक आहे. विटांनी बांधली गेलेली चैत्यगृहे अत्यंत दुर्मिळ आहे. महाराष्ट्रात तेर तर आंन्ध्रात चेझर्ला ही दोनच उदाहरणे आतापर्यन्त माहीत आहे. केवळ यांच्यावरुनच बोध्दाची बांधीव खडकात कोरलेली नव्हे. चैत्य मंदिर कशी असतील याची कल्पणा येऊ शकते. त्यामुळे तरेच्या हया वास्तूचे महत्व फार आहे. या वास्तूचा काळ पर्सी ब्राऊन यांच्या मते इ.स. पाचवे शतक तर कझिन्स च्या मते इ.स. ४ थे शतक नंतर निश्चितपणे नाही. तर माटे यांच्या मते इ.स. ७ वे शतक असा असावा तसेच त्रिविक्रम मंदिर पल्लव शैलीचे असून ते बौध्द नसून ते हिंदू मंदिर आहे.

## सन्दर्भ ग्रन्थ

1. Annual Report of the Archaeological Department of H.M.H. Nizam's Dominion,1929-30, A.C.P. 5 2. Barrett, Douglas, 1960 Ter, Bhulabhai Memorial Institute Bombay 3. Brown, percy, 1949, Indian Architecture (Buddhist and Hindu), Taraporewala Bombay. 4. Chapekar, 1669, Report on the Excavations at Ter, 1958, Poona . 5. Cousens H-, 1902-03 Archaeological survey of India Annual Report, PP. 195-204. 6. Fleet, J, 1901, "Tagara-Ter," Journal of the Royal Asiatic society, P.P. 537 ff. 7. Indian Archaeology, 1966-67-A Review, PP, 25-26, New, Delhi. 8. Maharashtra State Gazetteers, History, Part-1 - Ancient period, Bombay, 1967.